## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कोल्हापूर
## राजीव गांधी ग्रामीण निवारा क्र.१

**१) प्रस्तावना :-** महाराष्ट्र शासन गृह निर्माण विभागाकडील शासन निर्णय क्र.गृनियो-२००५/प्र.क्र.२४/०१/गृनिधो/१ दिनांक१.११.२००६ दा.रे. खालील व्यक्ती करीता घरकुल योजना राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ बाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.१ अंतर्गत दा.रे.खालील कुटुंबासाठी २०० चौ.फुटाची प्रति घरकुल र.रु.२८५००/- किंमतीची घरे पात्र लाभार्थ्यांना मोफत दयावयाची आहे. राज्य शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील विविध प्रवर्गासाठी आदा केलेल्या योजनेतील अनुदानातून वापरावयाचा आहे. या योजनेचा लाभ यापुर्वी इंदिरा आवास योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**२) योजनेचे निकष :-**

१) लाभार्थी दारिद्रय रेषेखालील यादीतील असावा.

२) लाभार्थीची निवड ग्रामसभेने करणेची असून ग्रामसभेने तयार केलेल्या कायम बेघर प्रतिक्षा यादीतील दा.रे.गुणानुक्रमे निवड करणेची आहे.

३) घरकुलासाठीची जागा लाभार्थीची स्वमालकीची /शासनाने उपलब्ध करुन दिलेली असावी.

४) घरकुलाचे बांधकाम २६९ चौ.फुटाचे असावे.

५) घरकुलास जोडून शौचालय बांधणेचे आहे.

७) पूर्ण घरकूल कुटुंबातील महिलेच्या किंवा पती-पत्नीच्या संयुक्त नांवे करणेचे आहे.

८) राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्रं.१ योजने अंतर्गत रु.६८५००/- इतके अनुदान दिले जाते.

९) घरकुलाचे बांधकामासाठी कंत्राटदार किंवा खात्याअंतर्गत एजन्सी यांचा सहभाग असणार नाही तर लाभार्थीला घर बांधकामाचे स्वातंत्र्य असणार आहे.

**३) योजनेचा उद्देश :-**

अनुसुचित जाती /जमातीचे सदस्य,मुक्त वेठबिगार आणि ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील बिगर अनु.जाती/ जमातीच्या गरीब व्यक्ती यांना सहाय्यक अनुदान देऊन त्यांच्या राहत्या घराच्या बांधकामासाठी मदत करणे योजनेचे मूळ उध्दिष्ट आहे.

**४) अंमलबजावणी :-**

या योजने अंतर्गत सन २००२ च्या दारिद्रय रेषेखालील परंतु निवारा नसलेल्या कुटुंबाची ग्रामपंचायत निहाय अनु.जाती/जमाती व बिगर अनुसुचित जाती/जमाती यांकरिता स्वतंत्र कायम प्रतिक्षा यादी बनविण्यात आलेली आहे. ही कायम प्रतिक्षा यादी तील कुटुंबाना मिळालेल्या गुणांकाप्रमाणे चढत्या क्रमोन बनविणेत आली आहे. या यादी नुसार पात्र लाभार्थ्यास गुणानुक्रमे घरकुल मंजूर करणेत येत होते. आता सन २०१०-११ पासून ग्राम विकास वक जलसंधारण विभागाकडील दि.९-४-१० च्या शासन निर्णयान्वये या पध्दतीमध्ये सुधारणा करणेत आली आहे. त्याप्रमाणे जिल्हयातील शिल्लक लाभार्थ्यांच्या चढत्या क्रमांकानुसार ग्रामपंचायत निहाय यादी करावयाची असून यादीतील लाभार्थ्यासमोर अ.जा./अ.ज. व अल्पसंख्यांक व इतर अशी नोंद घ्यावयाची आहे. त्यानुसार पहिल्या गावापासून सुरुवात करुन त्यातील प्रत्येक गावातील एकूण उद्दिष्टाच्या ६०% होईपर्यंत सर्व अजा/अज लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करावयाची असून त्यानंतर एकूण उद्दिष्टाच्या १५% होईपर्यंत अल्पसंख्याक व त्यानंतर इतर प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करावयाची आहेत. सदरचे प्रस्ताव ग्रामपंचायती मार्फत पंचायत समिती कडे मंजुरी साठी सादर केले जाते तेथे छाननी होऊन प्रशासकिय मान्यतेसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे कडे पाठविली जातात.